Vol 6 Issue 10 July 2017
ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University


Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 10 | JULY - 2017



# बौद्ध साहित्याची मूलतत्त्वे

*प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे*
*सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवरामजी मोघे महाविद्यालय,*
*पांढरकवडा, जि. यवतमाळ.*

*सारांश*

तथागत बुद्धाने बुद्धत्त्वप्राप्तीनंतर पहिले प्रवचन दिले त्यावेळी त्यांनी नवजीवनमार्ग प्रतिपादन केला. आपला जो मार्ग आहे, जो धम्म आहे त्याला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही कर्तव्य नाही. त्याचा मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही. तसेच धर्माच्या कर्मकांडाशी काहीही संबंध नाही. माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा बुद्धाच्या धम्माचा म्हणजेच बौद्ध साहित्याचा केंद्रवर्ती विषय आहे. बौद्ध साहित्याने माणसाला श्रेष्ठ मानले आहे. माणसाशिवाय कोणीही श्रेष्ठ नाही. अशा मानवतावादी विचाराने बौद्ध साहित्य मोहरून आले आहे.

माणूस दुःखात खितपत पडला आहे. संपूर्ण जग दुःखाने ग्रासले आहे. जगातून हे दुःख नाहीसे करणे ह्या संकल्पनेतून बौद्ध साहित्याने मूलतत्त्वे प्रतिपादन केले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला खऱ्या अर्थाने आदर्श जीवनासाठी बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वे निश्चितपणे उपयुक्त ठरणारे आहेत.

*बीजशब्द :* त्रिपिटक, मूलतत्त्व, प्रतित्यसमुत्पाद, आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग, अनीश्वरवाद, अनात्मवाद, कर्मसिद्धांत, नीती.

## प्रस्तावना

बौद्ध साहित्य 'त्रिपिटक' नावाने जगप्रसिद्ध आहे. यात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक या तीन ग्रंथांचा समावेश असल्यामुळे त्याला 'त्रिपिटक' असे म्हणतात. 'त्रिपिटक' तथागत बुद्धाच्या महान कल्याणकारी उपदेशांचा-प्रवचनांचा संग्रह आहे. त्यात जगातील सगळ्यां प्राणीमात्रांच्या सुखासाठी मार्ग प्रदर्शित केले गेले आहेत. म्हणूनच त्रिपिटकासारखे महान आणि जनहितकारी दुसरे कोणतेच साहित्य जगात असू शकत नाही. त्रिपिटकातील उपदेश सार्वभौम आणि सर्वांग संपूर्ण आहेत. सदाचाराने ओथंबलेले आहेत. त्यात माणसाला सर्वंकष सुखी बनविणारी शिकवण आहे. त्रिपिटक एक महान ज्ञानसागर आहे. या ज्ञानसागरातून मानव मुक्तीच्या विचारांचे सिंचन होते.

'त्रिपिटक' हा ग्रंथ म्हणजे प्राचीन भारतातील बहुजनांच्या प्रबोधनवादी मनाचे महान प्रतिबिंब आहे. बहुजनांच्या लढ्याचे व त्यांच्या संवेदनांचे रूप आहे. बुद्धाने सांगितल्याप्रमाणे दुःखाला नष्ट करून संपूर्ण मानव जातीला सुखी करण्यासाठी चाललेले विचारमंथन म्हणजे 'त्रिपिटक' हा विशाल ग्रंथ होय. त्रिपिटकाचा काळ हा इ. स. पूर्व सहाव्या शतकातील आहे. बौद्ध साहित्यातील 'त्रिपिटक' ही भारताची जगाला मिळालेली सर्वात मोठी आणि महान देणं आहे. बौद्ध साहित्यामध्ये मानवी कल्याणाच्या अनेक उपदेश सांगितले आहेत. बौद्ध साहित्यातील आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग हा मानवी जीवनाच्या कल्याणाचा 'मध्यममार्ग' होय. संयुक्तनिकायातील 'सळायतन सुत्तात' बुद्ध म्हणतात, ''धम्म आदी कल्याणकारी, मध्य कल्याणकारी आणि शेवटी कल्याणकारी आहे.'' हा धम्म बहुजनांच्या हितासाठी आणि सुखासाठी आहे.

बौद्ध साहित्याने काही सिद्धांत मांडले आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन सांगितले आहे. बौद्ध साहित्याने मूलतत्त्वं प्रतिपादन केली आहेत. जागतिकीकरणाच्या विज्ञानवादी युगात सुद्धा बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वे माणसाला उत्तम जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरतात. माणसाला आपले जीवन दुःखमुक्त करायचे असेल आणि संपूर्ण विश्वात शांतीचा आणि समतेचा सुगंध दरवळत ठेवायचा असेल तर आज प्रत्येकाने बौद्ध साहित्याचा अभ्यास करण्याची आणि त्यानुसार आचरण करण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच मानवी जीवन उन्नत करणाऱ्या बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वांचा उहापोह प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

*पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.*

१) बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वाचे स्वरूप समजून घेणे.
२) मानवी जीवनाच्या कल्याणासाठी बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वांचे महत्त्व अभ्यासने.
३) आज जागतिकीकरणाच्या युगात सुद्धा बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वे माणसाला आदर्श जीवन जगण्यासाठी उपयुक्त असल्याचे अभ्यासने.
४) माणूस त्याच्या कुशल कर्माने मोठा होतो याविषयी समजून घेणे.

५) संपूर्ण जग नीतीच्या आधारावर अवलंबून असल्याचे अभ्यासने.
६) माणसाचा विकास करणारा किंवा विनाश करणारा इतर कोणीही नसून माणूसच माणसाचा विकास करू शकतो किंवा विनाश करू शकतो, हा मानवतावादी विचार अभ्यासने.

### *गृहीतकृत्ये*
१) मूलतत्त्वे प्रतिपादन करून बौद्ध साहित्याने मानवतेचा पुरस्कार केला असल्याचे दिसून येते.
२) मानवी जीवन दुःखमुक्त करण्याच्या भूमिकेतून मूलतत्त्वे सांगितली असल्याचे लक्षात येते.
३) माणूसच माणसाचा विकासकर्ता किंवा विनाश कर्ता असल्याचे लक्षात येते.

### *तथ्यसंकलन*
प्रस्तुत शोधनिबंधाकरिता लिखित साहित्याच्या आधारे तथ्यसंकलन केले आहे.

### *बौद्ध साहित्याची मूलतत्त्वे*
बौद्ध साहित्याने संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी प्रतित्यसमुत्पाद, आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग, अनीश्वरवाद, अनात्मवाद, कर्मसिद्धांत आणि नीती ही मूलतत्त्वे प्रतिपादन केली आहेत. माणसाच्या जीवनात सुखाचा आणि आनंदाचा सुगंध दरवळवीणारी ही मूलतत्त्वे माणसाला सन्मान प्राप्त करून देते. त्याचे जीवन उज्ज्वल बनविते.

### *1. प्रतित्यसमुत्पाद*
दीघनिकाय मधील 'महावग्गा'त सांगितल्याप्रमाणे तथागत बुद्धाला सम्यक संबोधिच्यावेळीच प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांताचा प्रत्यय आला होता. विज्ञान आणि आत्मवाद व अनात्मवाद याविषयी आनंदास उपदेश करताना बुद्धाने 'प्रतित्यसमुत्पाद' सिद्धांत सांगितला आहे. प्रतित्यसमुत्पादाला 'सापेक्षतावाद' असेही म्हणतात. हाच बुद्धाचा 'मध्यम मार्ग' होय. सिंहनाद वग्गातील 'चुलसिंहनाद सुत्ता'त बुद्धाने कार्यकारणभाव म्हणजेच प्रतित्यसमुत्पाद सांगितला आहे. बुद्ध म्हणतात, ''प्रतित्यसमुत्पाद म्हणजे अविद्येपासून संस्कार उत्पन्न होतात. संस्कारापासून सळायतन उत्पन्न होते. सळायतनापासून स्पर्श उत्पन्न होते. स्पर्शापासून वेदना उत्पन्न होते. वेदनेपासून तृष्णा उत्पन्न होते. तृष्णेपासून उपादान (लोभ) उत्पन्न होते. उपदानापासून भव (कर्म) उत्पन्न होते. भवापासून जाती (जन्म) उत्पन्न होते. आणि जन्मामुळे म्हातारपण, मरण शोक याप्रमाणे सगळ्याा दुःखाचा समुदाय निर्माण होतो.''[१] बुद्धाचा हा कार्यकारणभाव म्हणजेच प्रतित्यसमुत्पाद होय. प्रतित्यसमुत्पादाचा सिद्धांत माणसात नैतिकता, शील, आचरण, कुशल कर्म या गुणांचा विकास घडवून आणते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथातील द्वितीय खंडातील तिसऱ्या भागात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताविषयी सांगितले आहे. ''सर्व विश्व 'प्रतित्यसमुत्पाद' म्हणजे कार्यकारण भावाच्या सिद्धांतावर आधारलेले आहे. आणि जी कारणे क्रियाशील असतात ती अमानसिक नसतात. उदाहरणार्थ, पेला ज्या सुवर्णाचा केलेला असतो ते अंतर्बाह्य सुवर्णच असते.''[२] म्हणून आपण ईश्वरपुजेच्या आणि त्याच्या प्रार्थनेच्या थोतांडाचा त्याग करूया. ज्यांच्यापासून काहीही फायदा नाही. अशा गुढ गोष्टीविषयी निष्फळ कल्पना करीत बसून आपण स्वतःचेच नुकसान करून घेऊ नये. आत्मा आणि स्वार्थीपणा यांचा आपण त्याग करूया. आणि कुशल कर्म करूया म्हणजे त्याचे फळही आपणास चांगले मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला प्रतित्यसमुत्पादाचा हा अर्थ व्यापक असा आहे. यावरून अनित्यता, दुःख, अनात्मता आणि निब्बाण या सर्व बाबीं प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांतावर म्हणजेच कार्यकारणभावाच्या सिद्धांतावर आधारित आहेत. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पटवून दिले आहे.

या संदर्भात पी लक्ष्मी नरसु यांनी म्हटले आहे की, ''Every Change is determined by a number of condition. The most striking of these condition is ordinarily called its cause, and the change itself is said to be the effect of that cause. Strictly speaking the cause (Pratyaya) of any change is the totality of all the conditions needed for its occurrence. That in the cause which makes the effect possible is spoken of as the reason (hetu) of the change. When a seed changes into a plant, that in the seed which makes it become a plant of a particular kind is the reason of the change, which the totality of conditions, such as the soil, water, light, air, space, needed for its germination and grouth, constitutes the cause. Is called Pratitya samutpada.''[३]

महाकवी अश्वघोष यांच्या 'बुद्धचरित्र' या ग्रंथात प्रतित्यसमुत्पादाचे विवेचन आहे. टी. एच. श्चेरवात्सकी यांनी प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांताला 'Theory of Causation' असे म्हटले आहे. 'मिलिंद प्रश्न' मध्ये नागसेनने कारणांची व्याख्या करून या सिद्धांताला सांगितले आहे. प्रो. पॉल कारूस यांनी 'The Gospeal Of Buddha' या पुस्तकात कर्माच्या पुनरावृत्तीला प्रतित्यसमुत्पाद म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे सर एडविन अर्नोल्ड आपल्या 'The Light Of Asia' या ग्रंथात प्रतित्यसमुत्पादाच्या मुख्य तत्त्वाला धरून माणसाला आग्रहाने प्रतिपादन करतात की, तुला देवी देवतांची आराधना करून काहीही मिळणार नाही. तू स्वतःच स्वतःच्या प्रगतीसाठी प्रयत्न कर. बदल हा निसर्गाचा नियम आहे. त्यानुसार प्रत्येक वस्तुमध्ये सारखा बदल होत असतो (Everything is in flux). या तत्त्वानुसार सामाजिक उत्क्रांतीचा परिवर्तनशील असा विज्ञाननिष्ठ सिद्धांत म्हणजेच प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत होय.

### *2. आर्यसत्ये*
मानवी जीवनातील दुःखाचा निरोध करणे हा बौद्ध साहित्याचा प्रमुख उद्देश आहे. दुःखनिवारण्यासाठी बुद्धाने 'धम्म्चक्र प्रवर्तन सुत्ता'त चार आर्यसत्ये सांगितली आहेत. मज्झिमनिकायातील 'सच्च विभंग सुत्ता'त चार आर्यसत्यांचे विस्तारित विवेचन केले आहे.

***1) दुःख आर्यसत्य–*** भिक्खूंनो! दुःख नावाचे पहिले आर्यसत्य आहे. जन्म दुःखकारक आहे. म्हातारपण दुःखकारक आहे. व्याधी दुःखकारक आहे. मरण दुःखकारक आहे. अप्रियांचा सहवास दुःखकारक आहे. प्रियांचा वियोग दुःखकारक आहे. एखाद्या वस्तूची इच्छा करून ती मिळाली

नाही म्हणजे त्यापासूनही दुःख होते. संक्षेपात पाच उपादानस्कंध दुःखकारक आहेत.
२) दुःख समुदाय आर्यसत्य- भिक्खूंनो! पुन्हा-पुन्हा उत्पन्न होणारी आणि अनेक विषयात रममाण होणारी तृष्णा, जिला कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णा असे म्हणतात. हे दुसरे आर्यसत्य आहे.
३) दुःख निरोध आर्यसत्य- भिक्खूंनो! उपेक्षेणे त्या तृष्णेचा पूर्ण विरोध करणे, तिचा त्याग करणे, तिच्यापासून मुक्ती मिळविणे. हे दुःख निरोधाचे आर्यसत्य आहे.
४) दुःख निरोधगामिनी प्रतिपदा आर्यसत्य- भिक्खूंनो! आर्यअष्टांगिक मार्ग म्हणजेच दुःख निरोधगामिनी प्रतिपदा आर्यसत्य आहे.

सुत्तपिटकातील संयुक्तनिकायमधील ‘सच्च संयुक्त’ मध्ये बुद्धाने चार आर्यसत्यासंबंधी १३१ सुत्त सांगितले आहेत. याशिवाय इतरही निकायात याचा उल्लेख अनेकवेळा आला आहे. बुद्धाचे अनेक उपदेश या चार आर्यसत्यावर आधारित आहेत. मज्झिमनिकायातील विभंग वग्गातील ‘सच्च विभंग सुत्त’ मध्ये चार आर्यसत्याचे विस्तारित विवरण आहे. वाराणसी जवळच्या सारनाथ येथिल ऋषिपतन मृगदायात विहार करीत असता तथागत बुद्धाने मानवी जीवन दुःखमुक्त करण्यासाठी चार आर्यसत्ये सांगितली आहेत.

### *3. आर्य अष्टांगिक मार्ग*

तथागत बुद्धाने पहिल्याच प्रवचनात अष्टांगिक मार्ग म्हणजेच सदाचाराचा मार्ग प्रतिपादन केला आहे. सम्यक मार्गाचे अनुसरण म्हणजे बौद्ध जीवन मार्गाचे अनुसरण होय. असे बुद्धाने सांगितले आहे. मानवी जीवनात सर्व मार्गामध्ये श्रेष्ठ मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग आहे. संयुक्तनिकायमधील महावग्गातील ‘मग्ग संयुक्त’ मध्ये तथागत बुद्धाने अष्टांगिक मार्ग सांगितला आहे.

एसोव मग्गो नत्थ६६ो, दस्सनस्स विसुद्धिया।
एतं हि तुम्हे पटिपज्जत्थ, मारस्सेत पमोहनं।।[४]

अर्थात, शुद्ध ज्ञानाच्या प्राप्तीसाठी, दर्शनासाठी हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा कोणताही मार्ग नाही. आपल्याला याच मार्गावरून चालायचे आहे. हा मार्ग माराचीही मती गुंग करून त्याला निस्तेज करू शकतो. ज्ञानप्राप्तीचा हा एकमेव मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग होय.

***1) सम्यक दृष्टी –*** अष्टांगिक मार्गातील प्रथम घटक सम्यक दृष्टी आहे. याच सिद्धांताच्या स्पष्टीकरणाने बुद्धाने आपल्या पहिल्या प्रवचनास सुरूवात केली होती. सम्यक दृष्टी म्हणजे कार्यकारणभावाची ओळख. असा सम्यक दृष्टीचा परिचय बाबासाहेबांनी करून दिला आहे. मज्झिमनिकाय मधील ‘सम्मादिट्ठी सुत्ता’त सांगितल्याप्रमाणे, ‘‘बौद्ध वाङ्मयात दुःखाचे ज्ञान, दुःख समुदायाचे ज्ञान, दुःख निरोधाचे ज्ञान आणि दुःख निरोधगामी मार्गाचे ज्ञान याला सम्यक दृष्टी म्हणतात.’’[५] सम्यक दृष्टीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘‘ज्या सिद्धांतांना वास्तवतेचा किंवा अनुभवाचा आधार नाही. व ते केवळ काल्पनिक अनुमाने आहेत ते सिद्धांत सम्यक दृष्टीसाठी त्याज्य आहेत.’’[६] अर्थात, सम्यक दृष्टीमुळे माणसाच्या ज्ञानात वृद्धी होते. यातूनच त्याला परिवर्तनाचा क्रांतीकारी मार्ग सापडतो.
***2) सम्यक संकल्प –*** बौद्ध साहित्यानुसार सम्यक संकल्प म्हणजे एकांत सुखाची आवड, प्राणीमात्रांवर शुद्ध प्रेम, दुसऱ्यास किंवा आपणास त्रास होऊ नये अशी इच्छा, या तीन संकल्पनांना सम्यक संकल्प म्हणतात. धम्मपदातील पहिल्या दोन गाथेतून सम्यक संकल्पाची परिभाषा स्पष्ट होते. मज्झिमनिकायमधील ‘महाचत्तारीकसुत्त’ आणि ‘द्वेधावित्तक्कसुत्त’ यामध्ये तथागतांनी सम्यक संकल्पाबाबत उपदेश केले आहेत.
***3) सम्यक वाचा –*** बौद्ध साहित्यानुसार खोटे न बोलणे, चहाडी न करणे, कठोर शब्द न उच्चारणे, आणि वृथा भाषण न करणे याला ‘सम्यक वाचा’ म्हणतात.

सहस्समपि चे वाचा अनत्थपदसंहिता।
एकं अत्थपदं सेय्यो यं सुत्त्वा उपसम्मति।।[७]

अर्थात, निरर्थक असलेल्या हजारो शब्दापेक्षा, जे ऐकून मन शांत होते, असे एखादे सार्थ वचन केव्हाही श्रेष्ठ असते.
***4) सम्यक कर्म –*** जीवन हिंसा न करणे, दुराचार न करणे, मादक पदार्थांचे सेवन न करणे, चोरी न करणे व पदरागमन कामोपभोग जो मिथ्याचार आहे तो न करणे याला बौद्ध साहित्यात ‘सम्यक कर्म’ म्हटले आहे. तथागत बुद्धांनी सांगितलेले ‘पंचशील’ हे सम्यक कर्माचे सुत्र आहे. अंगुत्तर निकायात याविषयी बुद्धाने उपदेश केले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार, ‘‘सम्यक कर्मान्त हे योग्य वर्तनाची शिकवण देते. दुसऱ्यांच्या भावना आणि त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी अशी याची शिकवण आहे.’’[८] जीवनाच्या मूलभूत नियमांशी सुसंगत असे वर्तन हे सम्यक कर्मान्ताचे प्रमाण होय.
***5) सम्यक आजीविका –*** वाईट मार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मार्गाने करणे याला बौद्ध साहित्यात सम्यक आजीविका म्हणतात. सम्यक आजीविका म्हणजे उत्तमप्रकारे जीवननिर्वाह चालविणे. तथागतांनी निषिद्ध केलेले व्यापार यात शस्त्रांचा व्यापार, प्राण्यांचा व्यापार, मद्याचा व्यापार, मांसाचा व्यापार आणि विषयाचा व्यापार, हे पाच व्यापार सोडून दुसऱ्या कोणत्याही उचित व्यापार-उद्योगाने जीवन चरितार्थ चालविणे. यालाच तथागताने ‘सम्यक आजीविका’ म्हटले आहे.
***6) सम्यक व्यायाम –*** अंगुत्तर निकायमध्ये बुद्धाने चार प्रकारचे सम्यक प्रयत्न सांगितले आहेत. १) संयम प्रयत्न २) प्रहाण प्रयत्न ३) भावना प्रयत्न आणि ४) अनुरक्षण प्रयत्न. या सम्यक प्रयत्नांचे विश्लेषण करून बुद्धाने सम्यक व्यायाम सांगितला आहे. सम्यक व्यायाम म्हणजेच सम्यक प्रयत्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सम्यक व्यायाम म्हणजे अविद्या नष्ट करण्याचा प्राथमिक प्रयत्न होय. असे म्हटले आहे. सम्यक व्यायाम म्हणजे माणसाला अविद्येपासून दूर नेणारा प्रकाशमार्ग आहे.
***7) सम्यक स्मृती –*** शरीर विनाशी पदार्थांचे बनले आहे. हा विवेक जागृत ठेवणे, शरीरातील सुखदुःखादी वेदनांचे वारंवार अवलोकन करणे, स्वचित्ताचे अवलोकन करणे, आणि कार्यकारण परंपरा इत्यादी तात्त्विक गोष्टींचे चिंतन करणे या चार प्रकारांनी चित्ताला जागृत ठेवणे याला सम्यक स्मृती म्हणतात. डॉ. बाबासाहेबांच्या मतानुसार दुष्ट वासनांवर मनाचा पहारा ठेवणे हे सम्यक स्मृतीचे दुसरे नाव आहे. मिलिंद प्रश्नात राजा मिलिंदच्या प्रश्नाचे उत्तर देताना महास्थविर नागसेन म्हणतात, ‘‘स्मृती हित आणि अहिताचा शोध घेऊन, अहितकारक गोष्टींचा त्याग

करून, हितकारक गोष्टींचा स्वीकार करावयास लावते.''[९] मनाची सतत जागृती हा याचा अर्थ आहे.

*8) सम्यक समाधी –* सम्यक समाधीच्या प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ ध्यान अशा चार पायऱ्या आहेत. वितर्क, विचार, प्रीती, सुख आणि एकाग्रता ह्या पाच चित्तवृत्ती पहिल्या ध्यानात संपादन करता येतात. वितर्क आणि विचार हे शांत झाल्यानंतर प्रीती सुख आणि चित्ताची एकाग्रता असे द्वितीय ज्ञान संपादन करते. प्रीतीच्या त्यागाने तो उपेक्षायुक्त होतो. व जागृत (स्मृतिमान) समाधीसुखाचा अनुभव घेतो. अशाप्रकारे तृतीय ज्ञान संपादन करता येते. सुख आणि दुःख यांचा निरोध करून सुखदुःखविरहित व उपेक्षा आणि एकाग्रता यांनी परिशुद्ध असे चतुर्थ ज्ञान संपादन करतो. ही चार ज्ञाने संपादन करणे याला 'सम्यक समाधी' म्हणतात.

सम्यक स्मृतीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''समाधी म्हणजे केवळ चित्ताची एकाग्रता, लोभ, द्वेष, आळस व सुस्ती, संशय आणि अनिश्चय हे पाच अडथळे म्हणजे बंधने होत. या बंधनांना दूर करण्याचा मार्ग म्हणजे समाधी होय.''[१०] आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी 'बुद्ध धम्मावरील चार निबंध' यामधील 'समाधी मार्ग' मध्ये सम्यक समाधीचे विस्तारित विवेचन केले आहे.

### *4. अनीश्वरवाद*

बौद्ध साहित्याने ईश्वराचे अस्तित्व नाकारले आहे. विश्वातील असा एकमेव धम्म आहे जो निरश्वरवादी आहे. ज्याला ईश्वर मान्य नाही. फक्त जीवांचे कल्याण अपेक्षित आहे. तो धम्म म्हणजे 'बुद्धधम्म' होय. जगात बुद्धधम्म हा अनीश्वरवादासाठी प्रसिद्ध आहे. तथागत बुद्धाने ईश्वराच्या अस्तित्वाचा सिद्धांत अमान्य केला. हा सिद्धांत सत्यावर आधारलेला नाही. हा विचार त्यांनी 'वासेट्ठ सुत्त' आणि 'भारद्वाज सुत्त' या सुत्तांमध्ये वासेट्ठ आणि भारद्वाज या ब्राह्मणांबरोबर केलेल्या संभाषणात स्पष्ट केला आहे. दीघनिकाय मधील पाथिक वग्गातील 'पाथिक सुत्ता'मध्ये ब्रह्माच्या सृष्टिकर्तापणाची कल्पना हाणून पाडली आहे. त्याचे खंडन केले आहे. त्या अहंकाराला नष्ट करून टाकले आहे. मज्झिमनिकायातील चुल्ल यमक वग्गातील 'ब्रह्मनिमंतनीक सुत्ता'त बुद्धाने सृष्टिकर्ता ईश्वर किंवा ब्रह्मा आहे. असे म्हणने एकदमच बिनबुडाच्या गाडग्यासारखे आहे. असे स्पष्ट सांगितले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथातील 'ईश्वरावर विश्वास हे धम्माचे आवश्यक अंग नव्हे' या प्रकरणात बुद्धाच्या ईश्वरविषयक विचारांची सविस्तर मांडणी केलेली आहे.

बुद्ध म्हणतात, ''ईश्वराधीन धर्म हे कल्पनाश्रीत धर्म आहेत''[११] आचार्य नरेंद्रदेव म्हणतात, ''समस्त कार्यकारणात्मक जगत प्रतित्य समुत्पन्न है। हेतु और प्रत्ययोकी अपेक्षा करके ही समस्त धर्मोकी धर्मता सिद्ध है। इसलिए इस नय मे ईश्वर ब्रह्मा आदि कल्पित कारको का प्रतिषेध है।'' [१२] बुद्धाने ईश्वर हा सृष्टीचा निर्माता नाही, हा विचार मांडला तो निसंदेह देवावरील विश्वासाचे खंडण करणारा आहे. डॉ. बाबासाहेबांनी हा विचार प्रतित्यसमुत्पाद सिद्धांतात अंतर्भूत आहे असे सांगितले आहे.

### *5. अनात्मवाद*

बुद्धाने आत्म्यावर आधारलेला धर्म हा कल्पनाश्रित धर्म आहे, असे म्हटले. आत्म्यावर विश्वास ठेवणे निरूपयोगी आहे. बुद्धाचा आत्म्यावर विश्वास नव्हता म्हणून त्यांच्या सिद्धांताला 'अनात्मवाद' म्हणतात. मज्झिमनिकायातील 'पंचत्तय सुत्ता'त बुद्धाने सांगितले की, आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास हे ब्राह्मणी धर्माचे एक अंग आहे. ब्राह्मणी धर्मात जीवाला आत्मा आणि आत्मन संबोधितात. ब्राह्मणी धर्मात आत्मा हे त्या तत्त्वविशेषाला नाव दिले आहे की, जे शरीरापासून वेगळे परंतु जन्मापासून शरीरात वास्तव्य करते. आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास तद्नुषंगिक विश्वास अंतर्भूत होतात. आत्मा शरीराबरोबर मरण पावत नाही. तो दुसऱ्या शरीरात जन्म घेतो. शरीर हे आत्म्याचा पेहराव आहे. असे ब्राह्मणांचे मत आहे. बुद्धाने आत्म्यावर कधीच विश्वास ठेवला नाही. म्हणून त्यांच्या सिद्धांताला 'अनात्मवाद' म्हणतात.

नामरूप ही प्राण्यांची सामुहिक संज्ञा आहे. बुद्धाच्या मतानुसार प्राणी हा काही भौतिक तत्त्वे आणि काही मानसिक तत्त्वे यांच्या संमिश्रणाचा परिणाम आहे. या भौतिक आणि मानसिक तत्त्वांना स्कंध म्हणतात. 'रूप स्कंध' हे मुख्यत्वेकरून पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू या चार तत्त्वांचा परिणाम आहे. हे स्कंध रूप अथवा शरीराचे घटक होत. रूप स्कंधाशिवाय मानसस्कंध हा एक भाग आहे. आणि तेही प्राण्यांच्या संरचनेचे घटक आहेत. ''ह्या नामस्कंधाला विज्ञान (चेतना) असे म्हणतात.''[१३] या नामस्कंधात तीन मानसिक घटकतत्त्वे आहेत. १) वेदना (सहा इंद्रियांच्या त्यांच्या-त्यांच्या विषयाशी संपर्क झाल्यामुळे होणारी अनुभूती.), २) संज्ञा (सय्या), आणि ३) संस्कार (संकार) विज्ञान (चेतना). या तीन नामस्कंधात समाविष्ट केले जाते.

विज्ञान (चित्त) याची उत्पत्ती कशी होते? याविषयी बौद्ध साहित्यामध्ये मज्झिमनिकाय मधील देवदह वग्गातील 'पंचत्तय सुत्ता'त विस्ताराने सांगितले आहे. याचे विज्ञाननिष्ठ विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथातील 'आत्म्यावरील विश्वास हा अधर्म आहे' या प्रकरणात दिले आहे. बुद्धाने आत्म्याच्या अस्तित्वाचे खंडन केले आहे. ''आत्म्याचे अस्तित्व हे धम्माचे अंग असू शकत नाही.''[१४] आत्म्याबाबत बुद्धाचे असे स्पष्ट मत आहे. मज्झिमनिकायातील महापुण्णम सुत्त, छन्नोवाद सुत्त, चुलसच्चक सुत्त, चुल वेदल्ल सुत्त, त्याचप्रमाणे संयुक्तनिकायातील राहुल संयुक्त, इत्यादी सुत्तामधून बुद्धाने अनात्मवादावर उपदेश केले आहेत, प्रवचने दिली आहेत.

### *7. कर्मसिद्धांत*

बौद्ध साहित्यात धम्माच्या मूलतत्त्व कम्मनियमाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. 'कम्म' (कर्म) म्हणजे मनुष्याकडून केले जाते ते कार्य आणि विपाक म्हणजे त्याचा परिणाम. जर नैतिक व्यवस्था वाईट असेल तर त्याचे कारण मनुष्य अकुशल कर्म करतो. आणि नैतिक व्यवस्था चांगली असेल तर त्याचा अर्थ मनुष्य कुशल कर्म करीत आहे असा होतो. म्हणून बुद्ध म्हणतात, ''नैतिक व्यवस्था ही ईश्वर सांभाळीत नसून ती कर्म नियमाप्रमांणे सांभाळली जाते.''[१५] यामुळेच 'कर्म' हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे हे मानणे म्हणजे 'धम्म' होय, असे बाबासाहेब म्हणतात.

धम्मपदातील 'लोकवग्ग' मधून बुद्धाने चांगले कर्म करायला सांगितले आहे. यात अंगुलीमाल स्थविराची कथा सांगितली आहे. या कथेद्वारे उपदेश देवून कुशल कर्म हा जीवनाचा सिद्धांत सांगितला आहे. धम्मपदात म्हटले आहे-

> यस्स पापं कतं कम्मं कुसलेन पिथीयति।
> सो'मं लोकं पभासेति अब्भा मुत्तो' व चन्दिमा।। [१६]

अर्थात, ज्याचे कर्म चांगले आहेत, ते चांगले कर्म वाईट कर्माला झाकून टाकतात. जसा ढगातून बाहेर पडलेला चंद्रमा सर्व जगाला प्रकाशमान करतो. त्याप्रमाणे चांगले कर्म सुद्धा आपले जीवन प्रकाशमान करते.

धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मि लोके परम्हिचं।। [१७]

अर्थात, धम्माप्रमाणे आचरण करावे. दुराचरण करू नये. धम्माप्रमाणे आचरण करणारा मनुष्य आपले जीवन यशस्वीपणे जगू शकतो. याचा अर्थच असा की, आपले कर्म कुशल असावे. अकुशल कर्म हे मानवी जीवनासाठी अधोगतीचे आहे. कुशल कर्म करून जीवन यशस्वी करणे हा बौद्ध साहित्यातील कर्मसिद्धांताचा सार आहे.

८. नीती

बौद्ध साहित्यामध्ये नीतीला फार महत्त्व आहे. बौद्ध साहित्यात प्रार्थना, तिर्थयात्रा, कर्मकांड, विधी अथवा यज्ञ अशा गोष्टींना स्थान नाही. धम्मामध्ये नीतीला महत्त्वाचे स्थान आहे. जगातील नैतिक व्यवस्था ही माणसांवर सोपविलेली आहे. इतर कोणावरही नाही असे बुद्धाने सांगितले आहे. कम्मनियमाप्रमाणे आपली नैतिक व्यवस्था सांभाळली जाते असे बौद्ध साहित्यात सांगितले आहे. धम्मात नीतीचे स्थान कोणते? या प्रश्नाचे उत्तर बाबासाहेबांनी असे दिले आहे, ''नीती म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीती.''[१८] इतक्या सोप्या शब्दात बाबासाहेबांनी नीती समजावून सांगितली आहे. नीती हे धम्माचे सार आहे. त्याशिवाय धम्म नाही. यावरून नीतीचे बौद्ध साहित्यात किती उच्च कोटीचे स्थान आहे, हे लक्षात येते.

## *समारोप*

समारोप करताना सांगावेसे वाटते की, संपूर्ण मानवी जीवनाला दुःखमुक्त करून मानवी जीवनात आनंदाची बाग फुलविण्यासाठी बौद्ध साहित्यातून प्रकाशलेली मूलतत्त्वे म्हणजे उजेडाची धम्मवाट आहे. ही मूलतत्त्वे मानवी जीवनाच्या उत्कर्षाची दिशा आहे. एक आदर्श जीवन जगण्याची पद्धती आहे. आज अवघे जग जागतिकीकरणाच्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे. याचा परिणाम संपूर्ण मानवी जीवनावर होत आहे. देशात अनेक प्रकारचे प्रश्न उभे होत आहेत. दहशतवाद आणि आतंकवाद सारख्या समस्यांनी मानवी जीवनात भितीचे वातावरण निर्माण होत आहे. महिलांवर होत असलेल्या अन्यायावरून महिलांच्या सुरक्षेचा आणि संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विज्ञानाचे युग म्हणत असलो तरीही बुवाबाजी आणि अंधश्रद्धेसारख्या प्रथा-पद्धती सुरूच आहेत. एकूणच काय तर देशात सर्वत्र अस्थिरतेचे वातावरण निर्माण होत चालेले असल्याचे बोलल्या जात आहे. या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाचे सर्वांगाने कल्याण साधण्यासाठी बौद्ध साहित्यातील मूल्यतत्त्वानुसार आचरण करण्याची आवश्यकता आहे.

## *निष्कर्ष*

प्रस्तुत विवेचनावरून जे निष्कर्ष निघालेत ते पुढीलप्रमाणे-

१) बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वे मानवी जीवन उन्नत करणारे आणि नैतिकतेने उजाळून टाकणारे आहेत असे जाणवते.

२) मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध साहित्याने मानवी जीवन मंगलमय करण्यासाठी मूलतत्त्वे सांगितले असल्याचे लक्षात येते.

३) माणूस त्याच्या कुशल कर्माने मोठा होत आल्याचे दिसून येते.

४) जगातील नैतिक व्यवस्था माणसांवर सोपविलेली आहे इतर कोणावरही सोपविलेली नसल्याचे लक्षात येते.

५) माणसाचा विकास करणारा किंवा त्याची विनाश करणारा इतर कोणीही नसून माणूसच माणसाचा विकास करण्यास किंवा विनाश करण्यास कारणीभूत असल्याचे लक्षात येते.

६) संपूर्ण विश्व प्रतित्यसमुत्पाद म्हणजेच कार्यकारणभावावर आधारलेले असल्याचे लक्षात येते.

७) अष्टांगिक मार्ग हा मानवी कल्याणाचा मध्यम मार्ग असल्याचे समजून येते.

८) आज जागतिकीकरणाच्या युगात सुद्धा बौद्ध साहित्यातील मूलतत्त्वे माणसाला आदर्श जीवन जगण्यासाठी उपयुक्त असल्याचे लक्षात येते.

## *संदर्भ सूची*


१. तिस्सवंस भदन्त : सुत्तपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, २००६, पृ. ६८.

२. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, (अनुवाद-घनःशाम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, शां. शं. रेगे), प्रकाशक, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, अठरावी आवृत्ती, २००५, पृ. ११६.

३. Narasu P. Lakshmi : The Essence Of Buddhism, Buddha Bhumi Prakashan, Nagpur, Second Edition, Page No.144-

४. भगत आचार्य सूर्यकान्त, भस्मे डॉ. राजेंद्र (अनु, संपा.) : धम्मपद गाथा आणि त्यांच्या अट्ठकथा, सुधीर प्रकाशन वर्धा, प्रथम आवृत्ती, ६ मे २०१२, पृ. २६२.

५. तिस्सवंस भदन्त : सुत्तपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, २००६, उनि. पृ. ६७.

६. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, उनि. पृ. ६८.

७. भगत आचार्य सूर्यकान्त, भस्मे डॉ. राजेंद्र (अनु,संपा.) : धम्मपद गाथा आणि त्यांच्या अट्ठकथा, उनि. पृ. १२०.

८. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, उनि. पृ. ६८.

९. भगत आचार्य सुर्यकांत : मिलिंद प्रश्न, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती, २८ सप्टेंबर, २००६, पृ. ७४.

१०. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, उनि. पृ. ६६.

११. तत्रैव, पृ. १६३.

१२. नरेंद्रदेव आचार्य : बौद्धधर्म-दर्शन, मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स प्राईवेट लिमिटेड, दिल्ली, प्रथम संस्करण, १९५६, पुनर्मुद्रण, २०११, पृ. २४१.

१३. तिस्सवंस भदन्त : सुत्तपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, २००६, उनि. पृ. १०६.
१४. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, उनि. पृ. २०४.
१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, १५ ऑक्टोबर, २००२, पृ. ४४४.
१६. भगत आचार्य सूर्यकान्त, भस्मे डॉ. राजेंद्र (अनु,संपा.) : धम्मपद गाथा आणि त्यांच्या अट्ठकथा,उनि.पृ. १८३.
१७. तत्रैव, पृ. १८०.
१८. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, उनि. पृ. २४६.



*प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे*
*सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवरामजी मोघे महाविद्यालय,पांढरकवडा, जि. यवतमाळ.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/